CNR No : MHAH-1900-1906-2023

दाखल तारीख - १३.१०.२०२३
नोंदणी तारीख - १३.१०.२०२३
निकाल तारीख - १०.०३.२०२६
कालावधी - **०१**व. **०८**म. **०२**दि.

**शेवगाव येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.३, शेवगाव**

**( पिठासीन अधिकारी – डी.आर. कुलकर्णी )**

**नियमीत फौजदारी खटला क्र.३०५/२०२३** **नि. क्र.४३**

गुन्हा नोंद क्रः ९२८/२०२३................ पोलीस स्टेशन, शेवगाव

| | | |
|---|---|---|
| **अभियोगपक्ष** | | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलिस ठाणे, शेवगाव<br>ता. – शेवगाव, जि. – अहमदनगर. |
| **अभियोगपक्षातर्फे** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता – श्रीमती पी.आर.गिते |
| **आरोपी** | | **१.वसिम यासीन शेख,**<br>वय — २३ वर्षे,<br>**२.यासीन हासन शेख,**<br>वय– ५३ वर्षे,<br>**३.शाईदा यासीन शेख,**<br>वय — ४५ वर्षे,<br>**४.आल्ताफ यासीन शेख,**<br>वय — १९ वर्षे,<br>**५.समीना सादीक पठाण,**<br>वय — २७ वर्षे,<br>**६.सादीक तय्यब पठाण,**<br>वय — ३३ वर्षे, |

| | | |
|---|---|---|
| | | **७.तय्यब गुलाब पठाण,**<br>वय – ६२ वर्षे,<br>आरोपी क्र.१ ते ४ रा. म्हाकाळ, ता.अंबड, जि. जालना.<br>आरोपी क्र.५ ते ७ रा.दहिफळ, ता.शेवगाव,<br>जि.अहमदनगर. |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | | श्री. ए.बी.शेख. |

**भाग – ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | मे, २०२२ ते दि.०३.०६.२०२३ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २३.०९.२०२३ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | १३.१०.२०२३ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :– | ०५.१२.२०२५ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :– | १४.०१.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवल्याचा दिनांक | :– | १०.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | १०.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात राखुन ठेवलेला आदेश | :– | आरोपींची निर्दोष मुक्तता. |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्र. | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.४२८ अन्वये समायोजीत (**set off**) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **वसिम यासीन शेख,** | निरंक | १४.०८.२०२५ | भा.दं.वि. ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६, सह ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २ | **यासीन हासन शेख,** | निरंक | १४.०८.२०२५ | भा.दं.वि. ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६, सह ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ३ | **शाईदा यासीन शेख,** | निरंक | १४.०८.२०२५ | भा.दं.वि. ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६, सह ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ४ | **आल्ताफ यासीन शेख** | निरंक | १४.०८.२०२५ | भा.दं.वि. ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६, सह ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ५ | **समीना सादीक पठाण** | निरंक | ०७.०७.२०२५ | भा.दं.वि. ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६, सह ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ६ | **सादीक तय्यब पठाण** | निरंक | ०७.०७.२०२५ | भा.दं.वि. ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६, सह ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ७ | **तय्यब गुलाब पठाण** | निरंक | ०७.०७.२०२५ | भा.दं.वि. ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६, सह ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग – क

## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र.४४ (ii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | अंजुम वसिम शेख, | फिर्यादी | नि.क्र.४० |
| २ | अलिशा रसुल शेख | साक्षीदार | नि.क्र.४१ |

**बचाव पक्षातर्फे साक्षीदार / न्यायालयातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार**

**/अभियोगपक्षामार्फत निशाणी /आरोपीतर्फे कबुल कागदपत्रे**

| | |
|---|---|
| निरंक | निरंक |

**न्यायालयामार्फत निशाणी देण्यात आलेली कागदपत्रे**

| | |
|---|---|
| -- | -- |

**मुद्देमालाचे वर्णन**

| | |
|---|---|
| निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

( घोषित दिनांक १०.०३.२०२६ )

आरोपींविरूध्द भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये खटला चालविण्यात आला आहे.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकिकत अशी की,**

०२) फिर्यादी व आरोपी क्र.१ चे लग्न दि.१२.१०.२०२१ रोजी हसनापुर, ता.शेवगाव येथे रितीरिवाजाप्रमाणे झाले होते. फिर्यादीचे लग्न झाल्यानंतर ती सासरी पाच महिने राहीली. त्यानंतर आरोपी क्र.१ ते ७ हे घरगुती कारणावरुन फिर्यादीस सतत शिवीगाळ करत होते. तसेच माहेरवरुन बांधकामासाठी ५,००,०००/- रुपये घेवुन ये असे फिर्यादीस म्हणायचे व फिर्यादीने पैसे आणले नाही तर आरोपी फिर्यादीस शिवीगाळ करुन लाथाबुक्याने मारहाण करत होते. सदर बाब फिर्यादीने तिच्या वडीलांना सांगितली असता त्यांनी आरोपींना समजावुन सांगण्याचा दोन तीन वेळा प्रयत्न केला, परंतु त्यांचे न ऐकता फिर्यादीस उपाशी

पोटी ठेवुन शिवीगाळ दमबाजी करुन शारिरिक व मानसिक त्रास देणेस सुरुच ठेवले. त्यानंतर काही दिवसांनी परत फिर्यादीस आरोपींनी तुझ्या वडीलांकडुन घर बांधण्यासाठी पाच लाख रुपये घेवुन त्रास देणे चालुच ठेवले तुला स्वयंपाक नीट येत नाही. तु सकाळी लवकर उठुन शेतात कामाला का जात नाही असे टोमणे त्रास देत होते. त्यानंतर दि.०३.०६.२०२३ रोजी पैशांच्या कारणावरुन फिर्यादीचे स्त्रीधन काढुन घेवुन तिला घराच्या बाहेर हाकलुन दिले. त्यानंतर फिर्यादीने भरोसा सेल अहमदनगर येथे जावुन मिटविण्याचा प्रयत्न केला परंतु आरोपींनी काहीही ऐकुण घेतले नाही. फिर्यादीने सदरची फिर्याद दाखल केली.

०३) पोलिस ठाणे, ता.शेवगाव यांनी सदरची फिर्याद गु.र.नं.९२८/२०२३ भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये नोंदवली आणि पुढील तपासकामी पो.हे.कॉ. बबन वसराम राठोड ब.नं.६५९ यांचेकडे दिली. त्यांनी तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

०४) आरोपींविरूध्द नि.२८ वर भारतीय दंड संहिता शिक्षापात्र कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये आरोप ठेवले. त्यातील मजकूर आरोपींना त्यांचे भाषेत वाचून व समजावून सांगितला असता, त्यांनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व खटला चालवण्याची मागणी केली.

०५) अभियोग पक्षातर्फे एकुण दोन साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. आरोपींविरुध्द कोणताही सबळ पूरावा आल्या नसल्याने आरोपींचा फौजदारी प्रकिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब नोंदविण्यात आलेला नाही.

०६) अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती पीर.आर.गिते आणि

आरोपीतर्फे ॲड.श्री.ए.बी.शेख यांचा युक्तिवाद ऐकला.

०७) खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित झाले, कारणांसह त्यांचे निष्कर्ष खालीलप्रमाणे :–

| **अ.नं.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | आरोपींनी त्यांचे समान उद्देशाच्या पुरःसरनार्थ, दिनांक मे, २०२२ ते दि.०३.०६.२०२३ रोजीच्या दरम्यान फिर्यादीस माहेरहुन पाच लाख रुपये घेवून येण्याची मागणी करुन फिर्यादीस शिवीगाळ केली व त्यांना मारहाण करुन शारिरीक व मानसिक छळ करुन क्रूर वागणूक दिली, अशा प्रकारे आरोपींनी भारतीय दंड संहीता कलम ४९८ (अ) अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो का ? | नकारार्थी |
| २. | वर नमुद वेळ, ठिकाण व दिनांक रोजी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत पोहोचविली हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नकारार्थी |
| ३. | वर नमुद वेळ, ठिकाण व दिनांक रोजी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीला शिवीगाळ करुन त्यांच्याकडून सार्वजनिक शांतता भंग होईल असे त्यांना प्रक्षोभित केले हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नकारार्थी |

| अ.नं. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| ४. | वर नमुद वेळ, ठिकाण व दिनांक रोजी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देवून फौजदारी पात्र धाकदपटशा केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नकारार्थी |
| ५. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

०८) अभियोग पक्षाने आरोपींविरूध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी सा.क्र.१ फिर्यादी अंजुम वसिम शेख यांना नि.क्र.४० वर व साक्षीदार क्र.२ म्हणुन अलिशा रसुल शेख यांना नि.क्र.४१ वर तपासले आहे. आरोपी व फिर्यादी दरम्यान तडजोड झाल्याबाबत नि.क्र.३९ प्रमाणे पुरसीस दाखल करण्यात आली. मुळ फिर्यादीने नि.क्र.४२ वर पुरावा बंद पुरसीस दाखल केली.

**मुद्दा क्र.१ ते ४ करिता :–**

०९) मुद्दा क्र.१ ते ४ एकाच घटनेशी संलग्न असल्याने विवेचन करण्यास सोयीचे होईल तसेच त्यामुळे पुनरावृत्ती टळेल याकरिता ते एकत्रात चर्चिले आहेत.

१०) अभियोग पक्षाने हे सिध्द करणे आवश्यक आहे की, मे, २०२२ ते दि.०३.०६.२०२३ रोजीच्या दरम्यान आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करुन मारहाण केली व

शारिरीक व मानसिक छळ करुन रु.५,००,०००/– रुपयांची मागणी करुन फिर्यादीला क्रूर वागणूक दिली.

११) आरोपी व फिर्यादीदरम्यान नातेसंबंधाबाबत विवाद असल्याचे दिसुन येत नाही. साक्षीदार क्र.१ अंजुम ही फिर्यादी असल्याने सदर साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षाकरीता अत्यंत महत्वाची आहे. सा.क्र.१ हिने तिच्या साक्षेमध्ये आरोपींदरम्यान नातेसंबंध कबुल केले. परंतु सदर साक्षीदाराने आरोपी व तिच्या दरम्यान किरकोळ वाद झाला होता व तिने आरोपींविरूध्द गैरसमजुतीने रिपोर्ट दिल्याचे कथन करुन त्या व्यतिरिक्त काही घडले नसल्याचे सांगितले.

१२) सा.क्र.१ हिने अभियोगपक्षास सहाय्य केले नसल्यामुळे अभियोग पक्षातर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला. परंतु अभियोगपक्षाने घेतलेल्या उलटतपासणीत देखील सदर साक्षीदाराने घटनेबद्दल काहीही सांगितले नाही. तसेच उलटतपासामध्ये देखील सदर साक्षीदाराने घटना नाकारली. परंतु आरोपी व तिच्या दरम्यानचा वाद मिटला असल्याबाबत कथन केलेले आहे.

१३) अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.२ अलिशा रसुल शेख यांची नि.क्र. ४१ वर साक्ष नोंदवली. फिर्यादी/साक्षीदार क्र.१ ही सदर साक्षीदाराची मुलगी आहे. तथापी सदर साक्षीदाराने देखील तिच्या साक्षीमध्ये आरोपी व तिच्या मुलीच्या दरम्यान किरकोळ वाद झाल्याचे कथन केलेले असुन या व्यतिरिक्त काही घडले नसल्याबाबत सांगितले.

१४) सा.क्र.२ हिने अभियोगपक्षास सहाय्य केले नसल्यामुळे अभियोग पक्षातर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला. परंतु अभियोगपक्षाने घेतलेल्या उलटतपासणीत

देखील सदर साक्षीदाराने घटनेबद्दल काहीही सांगितले नाही. तसेच उलटतपासामध्ये देखील सदर साक्षीदाराने घटना नाकारली. परंतु आरोपी व तिच्या दरम्यानचा वाद मिटला असल्याबाबत कथन केलेले आहे.

१५) सा.क्र.१ अंजुम/फिर्यादी व साक्षीदार क्र.२ यांनी त्यांच्या पुराव्यात आरोपींनी फिर्यादीस पैश्याच्या कारणावरुन शारिरीक व मानसिक त्रास दिला होता याबबात कहीही कथन केलेले नाही. साक्षीदार क्र.१ व २ यांनी घटनेबाबत काहीही कथन केलेले नाही. साक्षीदार क्र.१ व २ यांच्या पुराव्यातुन आरोपींचा घटनेशी संबंध प्रस्थापीत होत नाही. आरोपी व फिर्यादी यांनी त्यांच्या दरम्यान असलेला वाद मिटला असल्याबाबत तडजोड पुरुसीस नि क्र.३९ वर दाखल केलेले आहे. सा.क्र.१ व सा.क्र.२ यांच्या पुराव्यावरून आरोपी व त्यांच्या दरम्यान तडजोड झाली असल्याचे दिसून येते. त्यामूळे आरोपींविरूद्ध सदर साक्षीदार काहीही कथन करण्यास ईच्छुक नसल्याचे स्पष्ट होते. सा.क्र.१ हिनेच घटना नाकारल्यामूळे आरोपींनी त्यांचे समान उद्देशाच्या पुरःसरनार्थ, मे, २०२२ ते दि.०३.०६.२०२३ रोजीच्या दरम्यान आरोपींनी फिर्यादीस माहेरहून पाच लाख रुपये घेवून ये अशी मागणी करुन तिला मारहाण करुन शिवीगाळ केली आणि शारीरिक व मानसिक छळ करुन तिला क्रुरतेची वागणुक दिली, हे सिद्ध होत नाही. अभिलेखावर असा कोणताही तोंडी पुरावा आलेला नाही की, ज्याच्या आधारावर असे म्हणता येईल की, आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६ सह ३४ खालील दंडनीय गुन्हा केला आहे. सबब मुद्दा क्र.१ ते ४ चे निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.५ करीता मी खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१.वसिम यासीन शेख २.यासीन हासन शेख ३.शाईदा यासीन शेख ४.आल्ताफ यासीन शेख ५.समीना सादीक पठाण ६.सादीक तय्यब पठाण ७.तय्यब गुलाब पठाण यांना भारतीय दंड विधान संहिता १८६० चे कलम ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याच्या दोषारोपातून भारतीय नागरी संहिता १९७३ चे कलम २७१ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींची जामिन बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | आरोपींना पुढे असे निर्देशित करण्यात येते की, कलम ४८१ भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या पुर्ततेकरीता प्रत्येकी रूपये १५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र न्यायालयात दाखल करावेत. |

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

KULKARNI DATTATRAYA RAMESH
Digitally signed by KULKARNI DATTATRAYA RAMESH
Date: 2026.03.12 11:30:26 +0530

ठिकाणः शेवागाव (डी. आर. कुलकर्णी)

दि.१०.०३.२०२६. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,

कोर्ट नं.३ शेवगाव.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, याची पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | एस. ए. चोपणे |
| न्यायालयाचे नाव | : | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३, शेवगांव |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | १०.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | १०.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | १२.०३.२०२६ |